REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 8 | MAY - 2023

# पद्मशाली ज्ञाती संस्था, सोलापूरचा इ. स. १९७५ ते २००० पर्यंतचा इतिहास

**श्री. नागदेव रामशास्त्री म्याना**
बी. एस्सी (केमिस्ट्री), एम . ए. (ए. आय.एच.सी. & ए .)
संशोधन अभ्यासक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ.
आणि
प्रा.डॉ. टी. एन. शिंदे(एम. ए, सेट, पी.एच.डी.)
प्रमुख, इतिहास विभाग, ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालय, सोलापूर.

**सारांश**

पद्मशाली समाज स्वतः ऋषितुल्य समजतात. यजुर्वेदीय, वैदिक, सनातनी व धर्माभिमानी असून त्याप्रमाणे सगळे सण, नियम, धर्म, उत्सव व शुभाशुभ कर्मे पाळणारे आहेत शैव, वैष्णव, रामानुज असे मतवादी असले तरी सर्वजण पद्मशाली म्हणूनच ओळखतात तेलुगु, मराठी, कानडी, तामिळ, मल्याळम, तुळू, हिंदी व अरवम वगैरे विविध भाषा बोलणारे आहेत. मार्कंडेयाने प्रथम विष्णू भक्ती केल्याने वैष्णव व नंतर शंकराच्या वराने चिरंजीव झाल्याने शैव म्हणून वैष्णवोपासक व शैवोपासक असे दोन्ही आहेत.[1] समाजातील रूढी, विचार, देवधर्मासंबंधी कल्पना, आचार विचार, आहार, पेहराव या गोष्टी कालमानाप्रमाणे बदलत आहेत. पद्मशाली समाज या देशात सुमारे दोन कोटी आहेत. देशातील लोकसंख्येच्या मानाने अल्पसंख्यांक असल्याने सर्वत्र प्रसिद्धी नाही. गुरुकुल उत्पन्न पद्मशाली समाज उच्च संस्कृतीचा आहे. ऋषीमुनींनी आखून दिलेले नियम पाळतात. धर्म सिंधू ग्रंथात सांगितल्याप्रमाणे स्वतः ब्राह्मण म्हणून शास्त्रोक्त प्रमाणे तयार केलेले यज्ञोपवीत (जानवे) धारण करतात. सुवेर अथवा सुतक आल्यास नंतर नवीन यज्ञोपवीत धारण करतात. ब्राह्मणाप्रमाणे विविध वंश, सूत्र, शाखा आणि गोत्र आहेत. पद्मशाली यांना पद्मशाली, शाली, शेट्टीगर असे ओळख आहे. इसवी सन १९०० पूर्वी हा समाज हीनदीन, दुबळा, द्रव्यहीन, निरक्षर, स्वाभिमान शून्य, अज्ञानी व मानसन्मान रहित असा होता. १९ व्या शतकात अंगभूत कलागुणाने व कष्टाच्या बळावर समाजाने विविध क्षेत्रात प्रगती केली. हळूहळू अनिष्ट व कलंकीत रूढींचा त्याग केला. शिक्षणातही दिवसेंदिवस प्रगती केली. उद्योग धंद्यात भरारी मारली. काही लोक धनवान होऊन उद्योगपती म्हणून ओळखले जाऊ लागले. ही अल्प काळातील प्रगती पद्मशाली वंशीयांच्या वैभवात भर टाकणारे आहे.



**मुख्य शब्द :** पद्मशाली समाज, सोलापूरचा इ. स. १९७५ ते २००० पर्यंतचा इतिहास,

1.पद्मशाली संप्रदायाच्या आधारे दोन गटात विभागले गेले, शैव आणि वैष्णव असून ते शिव आणि विष्णू दोघांची पूजा करतात.
पद्मशाली ब्राह्मणांशी संबंधित असल्या तरी, त्यांना भारत सरकारने मागास (ओबीसी) जात म्हणून मानले आहे तर काही राज्यांमध्ये पुढे जात आहे. हा समुदाय अत्यंत संस्कृतप्रचुर आहे, सर्व पुरुष पवित्र धागा परिधान करतात आणि उत्तर भारतीय ब्राह्मण करतात अशाच प्रकारचे विधी करतात, जसे की उत्तर भारतीय ब्राह्मण जाती, त्यांचे मूळ गोत्र म्हणून ऋषींशी संबंधित आहे.


## प्रस्तावना

### पद्मशाली समाज

पद्मशाली यांचे मूळ स्थान दक्षिण भारतातील कालहस्ती, श्रीशैलम् व रामेश्वर या तीन लिंगाच्या परिसरात राहणाऱ्या जनतेला स्त्रीलिंगु असे म्हणत व त्यांच्या बोली भाषेत त्रिलिंगु भाषा म्हणत पुढे त्याचा अपभ्रंश होऊन तेनुगु अथवा तेलुगु असे झाले. पद्मशाली समाज मूळचे आंध्र प्रदेशातील सध्या तेलंगणा येथील हैदराबाद परिसरातील भागात राहणार आहे. इसवी सन १७५९ ते १९०० पर्यंतच्या काळातील सततच्या दुष्काळाने पोटापाण्याची व्यवस्था करण्यासाठी लोक मूळ स्थानापासून परागंदा झाले आणि त्या काळातील त्रावणकोर, कोचीन, म्हैसूर, वऱ्हाड, निजाम स्टेट, महाराष्ट्र व कर्नाटक अशा प्रांतात जाऊन राहिला. आणि त्याच्या प्रांतात आपला मूळचा हातमाग व्यवसाय व मातृभाषा सुरू ठेवली.[2]




कालहस्ती



श्रीशैलम्

[2] पद्मशाली कारागिरांनी हाती घेतलेली कामे प्रामुख्याने दक्षिण भारतीय राज्यांमध्ये आढळतात. पद्मशाली भार्गव ब्राह्मण हे रुग्वेदी ब्राह्मण आहेत. समुदायाचे सदस्य पारंपारिकपणे सर्व प्रकारचे कपडे बनविण्यात विशेष विणकर आहेत. ते सर्व संस्कार आणि विधी पार पाडण्यासाठी पुजारी ब्राह्मण म्हणून काम करतात आणि इतर जातींसाठी मंदिराचे पुजारी म्हणून सेवा देखील करतात.



रामेश्वर

## सोलापूरचा शहराचा इतिहास

सातकर्णींचे राज्य दक्षिणेत इसवीसन पूर्व २०८ ते इसवी सन २४८ पर्यंत होते. त्याची राजधानी पैठण प्रतिष्ठान या शहरात होते. सोलापूर हे गाव त्यांच्या राज्यात होते. त्यानंतर इसवी सन ७०७ पर्यंत चालुक्यांच्या ताब्यात, इसवी सन ९७३ पर्यंत राष्ट्रकूटांच्या ताब्यात, इ. स. ११८४ पर्यंत कल्याण चालुक्यांच्या ताब्यात व त्यानंतर देवगिरीचे यादव राजे यांच्या ताब्यात होते. इ. स. १३१८ पासून हा भाग मुसलमान यांच्या ताब्यात गेला. इ. स. १३४६ पासून सोलापूर बहामनी राज्यात मोडू लागले कालांतराने 1४९७ मध्ये ते निजामशाहीत सामल सामील झाले त्यापुढे विजापूरच्या आणि नगरकरांच्या तंट्यामुळे कधी विजापूरच्या आदिलशाहीत तर कधी अहमदनगरच्या निजामशाहीत सामील करून घेतले गेले इसवी सन १६२३ मध्ये मलिक अंबरने ते जिंकून घेतले इसवी सन 1७२३ मध्ये निजाम मुल्क हा दिल्ली शहरापासून कुठून स्वतंत्र झाला व त्याने दक्षिणेतल्या मोघलांच्या प्रदेशावर आपला अंमल सुरू केला त्यानंतर खरड्याच्या लढाईनंतर मराठी आणि निजाम यांच्या झालेल्या तहानुसार सोलापूर जिल्हा मराठ्यांच्या कडे आला. सोलापुरात श्री सिद्धेश्वर यांनी तलाव बांधून घेतला. त्या शेजारीच सोलापूरचा किल्ला बांधला. किल्ल्याभोवते खंदक आहे. इसवी सन १८१८ मध्ये पंढरपूर जवळील आष्टी येथे मराठ्यांचा इंग्रजांनी पाडाव केला आणि १४/५/१८१८ रोजी हे शहर इंग्रजांच्या अमलाखाली आले. १९४७ नंतर ते स्वतंत्र भारतात आले. सोलापूर शहर धार्मिक दृष्ट्या संपन्न आहे. सोळा गावांचे मिळून सोलापूर शहर बनविण्यात आले. त्यात सोन्नलगी या गावावरून सोन्नलगी पुढे सोलापूर असे नाव मिळाले.[3] श्री सिद्धेश्वरांचा भव्य असे मंदिर आहे. त्याच्या जवळच पद्मशाली समाजाने श्री मार्कंडेय मंदिर बांधले. सोलापूर शहराचे औद्योगिक प्रगती पण खूप झाली. 'दी सोलापूर स्पेलिंग अँड विविंग मिल' ही गिरणी बंद पडल्यावर त्यातील पद्मशाली कामगारांनी शहरातील पूर्व भागात पारंपार...हातमाग व्यवसाय सोबत यंत्रमाग पण सुरू केले. पद्मशाली समाजाचे या शहरांमध्ये सन १८४०च्या सुमारास आगमन झाले.

## पद्मशाली ज्ञाती संस्था, सोलापूरचा सुरुवातीचा इतिहास

इसवी सन १८४० च्या सुमारास पद्मशाली लोकांनी उदरनिर्वाहार्थ पूर्वीच्या निजाम संस्थानातून पायी चालत सोलापुरात येऊ लागले. भाषेच्या अडचणीमुळे ब्रिटिशांनी त्यांना पकडून सोलापूरच्या किल्ल्यात ठेवले. ते विणकर आहेत याची खात्री झाल्यावर त्यांना सोडून देण्यात आले व सरकारकडून सर्वतोपरी सहाय्य करण्यात आले. (इराबत्ती, 1970) जिल्हा कलेक्टरनी त्यांच्या वसाहतीसाठी विजापूर वेस ते जोडबसवण्णा चौकापर्यंत असलेल्या जंगलात वसाहत करण्यास व घरे बांधण्यास परवानगी दिली. त्याचा फायदा घेऊन पद्मशाली समाजातील काही लोकांनी हल्लीच्या शनिवार पेठेत घरे बांधली आणि स्थायिक झाले. सोलापुरातील आणि आजूबाजूच्या खेड्यातल्या लोकांना साड्या, चोळखण, धोतर, सदरा कापड आदींचे सोय करून दिल्याने आजूबाजूचे लोक खूष झाले. त्यामुळे पद्मशाली लोकांचा विणकर व्यवसाय वाढत गेला. सुरुवातीला

[3] सध्याचे सोलापूर शहर सोळा गावांमध्ये पसरलेले मानले जात होते. आदिलपूर, अहमदपूर, चपळदेव, फतेहपूर, जामदारवाडी, काळजापूर, खादरपूर, खंडेरवकीवाडी, महंमदपूर, राणापूर, संदलपूर, शेखपूर, सोलापूर, सोनलगी, सोनापूर आणि वैदकवाडी.

हातमागावर कापड निर्मिती होत असे.[4] उदरनिर्वाहाची सोय झाल्याने पद्मशाली यांची संख्या वाढू लागली. निजाम राजवट भागातून भागातून येणाऱ्यांची संख्या वाढली. त्यामुळे समाज सुधारण्यासाठी पंच व पंचायतीची आवश्यकता भासू लागली. फलमारी घराण्यातील माणसे प्रथम सोलापुरात आल्याने सर्वांच्या संमतीने कै. नरसप्पा कंपू फलमारी यांच्या नावाने प्रथम फंड नेमण्यात आले. पुढे इ.स. १८७९ पर्यंत एकूण २२ फंड निर्माण झाले. इतर घराण्यांनी पण समाजात त सामाजिक कार्य केले व त्यांनीही फंडाचे नेमणूक व्हावी म्हणून आग्रह केला. त्यामुळे सर्वांची सभा होऊन यापुढे आणखीन फंडांचे समाजात नेमणूक होऊ नये असा ठराव करण्यात आला. शहराच्या पश्चिम भागात असलेल्या गिरण्यातून काम करत त्यांची वस्ती जवळच्या चाळीत वाढू लागली. त्याकाळी पंचांचा मान राखणे आणि त्यांची आज्ञा पाळणे आवश्यक आहे असे समाजातील सर्व लोक समजत असत. शुभकार्याच्या प्रसंगी पंचायत व समाजास मानाचा विडा देण्याचा प्रघात आहे. समाजातील तंटे, मतभेद, कौटुंबिक वादविवाद हे पंचा तर्फे मिटवले जात. गुन्हेगारी स्वरूपाचे विषय होऊ नये याची दक्षता घेत. पंचांनी दिलेला निर्णय सर्वजण मान्य करीत आणि त्याकाळी जे लोक निर्णय मान्य करीत नसत त्यांच्यावर समाज बहिष्कार करीत असे. त्या त्याकाळी सरकारचा आक्षेपही नव्हता. त्यामुळे पंचांचा समाजावर दरारा होता. मान्य नसलेल्याने नंतर पंचाकडे गुन्हा कबूल केल्यास त्यांना पुन्हा समाजात घेत असत. त्याकाळी पंचमंडळींना समाजात प्रतिष्ठा होती. वर्षानुवर्षे ही पंचमंडळी समाजाची सेवा केली. सामाजिक कल्याणासाठी त्यांनी काही नियम घातले आणि आपल्या समाजास स्थिरता प्राप्त करून दिली.

### श्री मार्कंडेय चरित्र

मार्कंडेय पुराणात द्वितीय अध्यायात श्री ब्रह्मदेवांनी केलेल्या नवब्रम्हाच्या उत्पत्तीत श्री भृगु आहेत. भृगु ऋषी यजुर्वेदीय असून त्यांचे खालील ग्रंथ लिखित आहेत.

१) अथर्ववेदातील अनेक ऋचा.
२) भृगु संहिता - पृथ्वीवरील मानवाचे भूत भविष्याचे कथन.
३) भृगु वास्तुशास्त्र - बांधकाम विषयावरील शास्त्रीय ग्रंथ.
४) भृगु स्मृती.
५) भृगु गीता.
६) भृगु सिद्धांत.
७) भृगु सूत्र.



दक्ष प्रदापतींची कन्या ख्याती हे भ्रगुंची प्रथम पत्नी होय. त्यांना धाता आणि विधाता असे दोन पुत्र व लक्ष्मी नामक कन्या होते. लक्ष्मीचा विवाह भगवान श्री विष्णूशी झाला. धाता व विधाता यांचा विवाह मेरु मुनींच्या कन्या आयती व नियती यांच्याशी अनुक्रमे झाला. धाता व आयती यांच्यापासून श्री मृकंड महर्षींचा जन्म झाला. मृकंड महर्षींचा विवाह मरुध्वतीशी झाला. मृकंड महर्षी हे धर्मशास्त्र संपन्न, सतशील व परमेश्वर भक्त होते.

---

[4] कापूस, ताग, लोकर, रेशीम इत्यादींसह विविध प्रकारच्या कापडांवर प्रक्रिया करण्यासाठी हातमाग यंत्र तयार करण्यात आले आहे. कापडाच्या उत्पादनासाठी विविध कामे करण्यासाठी कुशल कारागिरांकडून वापरल्या जाणाऱ्या लाकडी चौकटींनी सुसज्ज आहे. हे यंत्र फॅब्रिकचे धागे धरून ते लांबीच्या दिशेने आणि रुंदीनुसार विणतात.

मृकंड महर्षी व मरुध्वती यांना बराच काळापर्यंत संतान झाले नाही. त्यामुळे त्यांनी शालिग्राम नाम तीर्थक्षेत्री दीर्घकाळापर्यंत निष्ठापूर्वक व्रतस्थ राहून व शंकराचे उग्र तपश्चर्या केले. अखेर भगवान शंकर प्रसन्न होऊन दर्शन दिले व इच्छित वर मागण्यास सांगितले. आपल्या वंशवृद्धीसाठी पुत्रप्राप्तीची इच्छा व्यक्त केले. तेव्हा शंकरांनी कर्तुत्ववान व धर्मपरायण पुत्र हवे असल्यास त्या मुलाचे आयुष्य फक्त सोळा वर्षे असेल असे सांगितले. त्यावर साधारण पुत्रापेक्षा ज्ञानी पुत्र अल्पायुषी असेल तरी चालेल, मी स्वीकार करेन असे सांगितले. भगवान शंकरांनी तथास्तु असे म्हणून अंतर्धान पावले. त्याप्रमाणे मरूध्वतीस महान तेजस्वी असे पुत्र संतान झाले त्याचे नाव मार्कंडेय असे ठेवले.[5] मार्कंडेयाचा जन्म दुंदुभी नाव सवत्सर, उत्तरायण, शिशिर ऋतू, माघ मास, शुक्लपक्ष, तृतीया तिथी, प्रातःकाली, शततारका नक्षत्र या मुहुर्तावर झाला. मार्कंडेयाचे योग्य समयी विधीपूर्वक जातकर्म संस्कार, उपनयन[6] विधी करून वैदिक धर्माची दीक्षा दिली व धर्माचरणाचे महत्त्व सांगितले आणि त्यासाठी आराधना करण्यास सांगितले. नारद मुनीनी एकदा मृकंड मुनींच्या आश्रमात आले असता मार्कंडेयांनी त्यांच्या चरणावर मस्तक ठेवून नमस्कार केला. तेव्हा नारद मुनींनी 'दीर्घायुष्यमान भव' असा आशीर्वाद दिला. युवावस्था प्राप्त होईपर्यंत मार्कंडेय यांनी ब्रह्मचर्यपालन, नित्यनैमित्तिक कार्य धर्मानुसार व जपतप यातच कालक्रमण करीत वेदाध्ययन व धर्मशास्त्राचा अभ्यास केला.

कालानुसार मार्कंडेयाचे वय पंधरा वर्षे पूर्ण होऊन सोळावे लागताच मार्कंडेय याचे वडील मृकंड महर्षी दिवसेंदिवस उदास दिसू लागले. एके दिवशी मार्कंडेय यांनी वडिलांना कारण विचारले असता त्यांनी मार्कंडेयाची जन्मकथा सांगितले व तुझ्या आयुष्याचे समाप्तीचा काळ आता जवळ आला आहे यामुळे काही सुचत नसल्याने मन बाईचे नाही असे सांगितले त्यावेळी मार्कंडेय यांनी पिताजी मी आता निष्ठापूर्वक श्री शंकराचे घोर तपश्चर्या करून प्रसन्न करून घेईन म्हणजे माझा मृत्यू होणार नाही आणि दक्षिण समुद्राच्या किनारी आपल्या मातापित्यांची आज्ञा घेऊन निघाले व तेथे शिवलिंगाचे स्थापना केली आणि नित्यनेमाने अत्यंत श्रद्धापूर्वक अनुष्ठान व गोर तपश्चर्या सुरू केले सोळा वर्षे पूर्ण होतात विधीलिखितानुसार यमदूत पाश घेऊन आले असता शंकराच्या पिंडीजवळ ध्यानस्थ मार्कंडेय आज पाहून रिकाम्या ते परत यमलोकास केले तेव्हा यमराज स्वतः रेड्यावर अरुण होऊन हातात पाश घेऊन त्या ठिकाणी आले तेव्हा मार्कंडेय यांनी शिवलिंगास आलिंगन करून म्हणाले मी आता भगवान श्री शंकराचे मृत्युंजय स्तोत्र स्तवन करीत आहे ते पूर्ण होईपर्यंत थांबावे व त्यांनी मृत्युंजय स्त्रोत्र पारायण सुरू केले तेव्हा यमराज म्हणाले मला थांबणे शक्य नाही असे म्हणून रागाने आपल्या हातातील मृत्यूपाश त्यांच्यावर टाकला तो मृत्यूपाश मार्कंडेय आलिंगन दिलेल्या शिवलिंगावर पडला. तत्क्षणी कैलासात असणारे भगवान शंकर स्वतःच्या गळ्यात मृत्यूपाश पडलेले पाहून खडबडून उठले व ताबडतोब त्या शिवलिंगात प्रकट झाले. हातात त्रिशूल घेतलेले त्रिनेत्र रुद्रावतारी महादेव अत्यंत क्रोधाय म्हणून मेघगर्जना करीत यम धर्मावर धावले व त्याच्या छातीवर जोराने लाथ मारली त्यामुळे यमराज दूरवर फेकले गेले मृत्युंजय स्त्रोत्राने प्रसन्न झालेले शंकर मार्कंडेय चिरंजीवी[7] भव असा आशीर्वाद दिला व ते अंतर्धान पावले याबद्दल सविस्तर माहिती नारद पुरानात आहे मृत्यूवर विजय प्राप्त केल्यावर मार्कंडेय परत आपल्या आश्रमात येऊन सर्व घटना सविस्तरपणे मातापित्यांना सांगितले असता त्यांना अत्यानंद झाला.

नंतरच्या काळात मार्कंडेय मुलींनी पद्मपुराण वराहपुराण मार्कंडेयपुराण यांचे रचना केली याशिवाय मार्कंडेय शिवस्त्रोत्र मार्कंडेय संहिता इत्यादी धर्मग्रंथ लिहिले हे ग्रंथ धर्मशास्त्रावर व संस्कार विधीसाठी सर्वत्र आधारभूत मानले जातात आपल्या तपसामर्थ्याने मृत्यूवर विजय मिळवल्याने ते चिरंजीव झाले व त्यांनी रचलेल्या ग्रंथ संपतेमुळे महर्षी अशी कीर्ती प्राप्त झाली. ऋषीमुनींनी असे सांगितले की यज्ञ करावा मार्कंडेय व्रतस्थ ब्रम्हचारी आहेत असा आक्षेप घेतला तेव्हा यज्ञ आरंभ झाल्यावर त्यातून बाहेर आलेला धूर हा मार्कंडेयाचे पत्नी म्हणून तिला धुम्रावती असे नाव द्यावे व यज्ञ यशस्वी करावे असा निर्णय झाला त्यानुसार लग्न केले असता त्यातून प्रथम निर्माण झालेल्या पुरुषास पंचपुटी व नंतर निर्माण झालेल्या पुरुषास भावनाऋषी असे नाव दिले पंचपुटी हे तपश्चर्येसाठी वनात निघून गेले व भावनाऋषी हे वेदाभ्यास करून धर्मशास्त्र पारंगत झाले त्यांनी वस्त्र निर्मिती करणाऱ्या हातमाग साधनाचा शोध लावला सर्वप्रथम कमळाच्या देठाच्या तंतूपासून वस्त्र तयार करून ते विष्णूस अर्पण केले त्यानंतर काळात हातमाग यंत्रापासून पुढे वस्त्र निर्मिती सुरू झाली भावना ऋषींचे ख्याती ऐकून कालवा सुराने त्याचा नाश

---

[5]श्री विष्णु पुराण मध्ये दहाव्या अध्यायात महर्षी मार्कंडेय यांच्या जन्माची माहिती पराशरांनी मैत्रेय यांना सांगितले

[6] ब्राह्मण, क्षत्रिय अशा विविध जाती हे संस्कार करतात. 'उपनयन' या शब्दात दोन शब्द आहेत; 'उप' म्हणजे जवळ आणि 'नयन' म्हणजे दृष्टी. म्हणून, याचा शाब्दिक अर्थ म्हणजे स्वतःला अंधारापासून (अज्ञानाची अवस्था) दूर ठेवणे आणि प्रकाशाकडे (अध्यात्मिक ज्ञान) प्राप्त करणे. अशा प्रकारे, हा सर्वात प्रसिद्ध आणि पवित्र विधी आहे.

[7] चिरंजीवी ही संज्ञा चिरम, किंवा 'कायम', आणि जीव, किंवा 'जिवंत' यांचे संयोजन आहे. हे अमरत्वासारखेच आहे, जे खऱ्या अमरत्वाला सूचित करते.

करण्यासाठी आला तेव्हा भावना ऋषींनी शरसंधान करून कालवा सुराचा वध केला भगवान विष्णूना अर्पण केलेल्या वस्त्रामुळे भावना ऋषी व त्यांच्या वंशांना पद्मशाली हे नामादेवान प्राप्त झाले भावना ऋषी यांनी सूर्यनारायणाची कन्या भद्रावते व्याघ्रंबरी तिच्याशी विवाह केला भावना ऋषी व भद्रावती यांच्यापासून जन्म झालेले त्यांची १०८ संतती व त्यांच्या वंशजांना पद्मशाली समाज असे ओळखले जाते कालवासुराचा वध केलेल्या दिवसाचे आठवण म्हणून पद्मशाली समाज श्रावण शुद्ध पौर्णिमेला मोठा उत्सव साजरा करतात

## मार्कंडेय मंदिर निर्मिती

पद्मशाली समाजाचे कुलदैवत श्री मार्कंडेय ऋषींचे सोलापुरात देवालय असावे असं एकमताने निर्णय होऊन सिद्धेश्वर तलाव परिसरात असणे योग्य असे सांगितले. पद्मशाली समाजाने श्री मार्कंडेय मंदिरसाठी सिद्धेश्वर पेठेतील सर्वे नंबर ६०५३ चे ८०x ७० फुटाचे जागा देवस्थानसाठी फाल्गुन शुद्ध नवमी रोजी रुपये ६२१ रुपयात खरेदी केली हे खरेदी कै. नरसप्पा कंपूलमारी कैलासवासी तिप्पणा महाकाल, कै. तुकाराम पापया गाजूल, कै. विठोबा नरसप्पा शहापूर, कै. पांडोबा नागप्पा केदारे, कै. मुसलप्पा तुकाराम जटला, कै. सिताराम शंकर नर्सेरावती कै. सायना हिरावती कै. कृष्णया त्याला पुढाऱ्यांच्या नावाने झाली शके१८१६ अधिक आषाढ मासात सन एक १८९४ साली देवालयाच्या बांधकामात सुरुवात झाली. पायासाठी ३२ बाय २० फुटाचे जागेत पाया खणण्याचे सुरू केले असता एक मोठी विहीर लागली. विहीर बुजवून पाया भरून बांधकाम करणे इतके आर्थिक शक्ती नसल्याने तेथे तळघर बांधून त्यात मार्कंड्याचे पुत्र भावना ऋषी व पुत्रवधू भद्रावती माता यांच्या मूर्ती बसवण्याचे ठरले. परंतु आर्थिक अडचणीमुळे थोडे पायावरून बांधकाम बंद केले. त्यानंतर पाच वर्षांनी तारीख आठ मे १८९९ रोजी बावीस फंडाचे व इतर पुढारी एकत्र येऊन देवालयाच्या निर्मितीसाठी आर्थिक उत्पन्न कसे करावे याचा विचार होऊन सर्वांमध्ये खालील निर्णय झाला. आपल्या ज्ञाती बांधवांमध्ये होणाऱ्या प्रत्येक लग्नकार्याच्या मागे रुपये आठ व गंधर्व्यवास रुपये सहा देवाचे हक्काचे म्हणून घेण्यात यावे . सदर हक्काचे रुपये वसूल करणे करता कै. यल्लाप्पा तुकाराम फलमारी कै. कै. हणमय्या संगप्पा सोमा, कै. लक्षमय्या व्यंकटनरसू ईराबत्ती, कै. बाळकृष्णप्पा कृष्णाप्पा तुम्मा, कै. नरसोबा विठोबा शहापूर या पाच पुढाऱ्यांना सर्वाधिकारी म्हणून नेमण्यात आले येत आहे. हक्काचे रुपये घेऊन लग्नाधी कार्याचे रजिस्टर ठेवण्याचे आणि हिशोब ठेवण्याचे अधिकार कै' बाळकृष्ण कृष्णप्पा तुम्मा यांना देण्यात येत आहे. कै. बाळकृष्णप्पा कृष्णप्पा तुम्मा हे हक्काचे रुपये पोहोचल्याचे पावती देतील. ती पावती पाहून लग्नकार्य परवानगी चिट्टी देण्याचा अधिकार लक्ष्मय्या व्यंकटनरसू ईराबत्ती, यांना देण्यात यावे. याशिवाय देवालयाच्या बांधकामाकरिता म्हणून प्रत्येक हातमागामागे एक रुपया वसूल करण्यात आला. या दोन्ही मार्गाने जमा झालेल्या पैशावर थोडे थोडे बांधकामात सुरुवात झाली. तळघर, वर देवालय आणि त्यापुढे दर्शन मंडप असे बांधकाम करण्यात आले. इ. सन १९० ६ साली कै. सिद्रामप्पा फलमारी यांनी आमच्या घराण्यास पहिल्या फंडाचा पुढारी म्हणून असल्याने मला धर्माधिकारी म्हणून निर्माण असा आग्रह धरला इसवी सन १९१७ मध्ये शृंगेरी मठाचे जगद्गुरु श्रीमत शंकराचार्य श्री शिवगंगा स्वामीजी यांचे सोलापुरात आगमन झाले असता त्यांनी श्रीफलमारे धर्माधिकारी ठरत नाहीत असा निर्णय दिला. तो सर्व पुढाऱ्यांनी मान्य केला. समाजातील तरुण पिढीने कार्यात सहभागी होताना लक्षात आले की २२ फंडाचे पुढारी व इतर जुन्या पुढाऱ्यांनी केलेल्या कामाची पाहणी करताना सन १८९३ पासून सन १९१७ पर्यंत २४ वर्षाच्या काळात श्री मार्कंडेय देवालयाचे बांधकाम तळघरासहित फक्त २१ फूट उंचीपर्यंत व पुढे जोत्याचे बांधकाम झाल्याचे दिसून आले. सन १९१८ साली श्री पद्मशाली देवस्थान संस्था स्थापन करण्यात आले. त्याचे अध्यक्ष कै. बाळकृष्ण तुम्मा व सेक्रेटरी म्हणून कै. तुकाराम कन्ना यांची निवड करण्यात आली. त्याचे कामकाज श्री पद्मशाली बिल्डिंगमध्ये सुरू झाले. त्यावेळी समाजातील अनेक धनिक मंडळींनी मंदिरासाठी देणगी जाहीर केली. दरम्यान प्लेगची[8] साथ सुरू झाली. त्यामुळे त्या काळात विशेष काम झाले नाही. जाहीर झालेल्या देणग्याची वसुली झाल्यावर मंदिराचे बांधकाम गतीने सुरू झाली. सोलापुरातील ब्राह्मणांनी मूर्ती प्रतिष्ठापनासाठी शके १८४६ मिती श्रावण शुद्ध ७ तारीख ७/८/१८२४ या दिवशी करण्यास सांगितले. १/६/१९२४ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत काळा पाषाणाच्या मूर्तीची स्थापना करण्यात यावी असे बहुमताने ठरले. देणगी वसुलीसाठी पेठवार ९७ कार्यकर्त्यांची यांची नेमणूक झाली. देणगीस नकार देणाऱ्यावर बहिष्कार घालण्याचे

[8] भारतातील 1918 फ्लू साथीचा रोग हा जगभरातील स्पॅनिश फ्लू साथीच्या रोगाचा एक भाग म्हणून 1918 आणि 1920 दरम्यान ब्रिटिश भारतातील असामान्यपणे घातक इन्फ्लूएंझा साथीचा उद्रेक होता. भारतात बॉम्बे इन्फ्लूएंझा किंवा बॉम्बे फिव्हर म्हणूनही संबोधले जाते, या साथीच्या रोगाने देशात 17-18 दशलक्ष लोक मारले आहेत असे मानले जाते, सर्व देशांमध्ये सर्वात जास्त. डेव्हिड अरनॉल्ड (2019) च्या अंदाजानुसार किमान 12 दशलक्ष मृत, लोकसंख्येच्या सुमारे 5%.

ठरवल्याने अनेकांनी स्फूर्तीने देणगी दिली. कारखानदारांनी चांदीच्या पादुका, समया, पितळी प्रभावळ, सोन्याचा चंद्रहार असे वस्तु भेट दिली. पहिल्या फंडाचे मानकरी श्री कंपू फलमारी व त्यांची पत्नी या उभयतांनी धार्मिक विधी पार पाडले. मार्कंडेय मंदिरासमोर भव्य मंडप उभारून कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास परगावचे मान्यवर आले. दुपारी हलग्या, चौघडा, ताशे, बँड, गाड्या, घोडे, मोटारी, पताका अशा थाटात श्रींची पालखीतून मिरवणूक काढली. संध्याकाळी साडेसहा वाजता मार्कंडेय मंदिर जवळ मिरवणूक विसर्जन पावले. या मिरवणुकीस समाजातील पंधरा हजार स्त्री पुरुष सहभागी झाले. रात्री कीर्तनात सुमारे पाच हजारावर लोक जमले. यावेळी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवला. ५ ऑगस्ट १९२४ मंगळवार रोजी सकाळी पुण्याहवाचन, ब्राह्मण वर्जन, असे विविध कार्यक्रम करण्यात आले. तिसऱ्या दिवशी ६/८/१९२४ रोजी धान्याशयन, पंचामृताशयन, जलाशयन पूजा वगैरेने मूर्तीला शुद्ध करण्यात आले. सर्व परिसरात फळ विक्रेते हार खेळणी मिठाई यांची भरपूर गर्दी झाली. चौथ्या दिवशी ७/८/१९२४ गुरुवार रोजी चौघडे नगारे बँड वगैरेंच्या आवाजात व देवस्थानच्या सुशोभीकरणाने कार्यक्रम झाले. सकाळी १०.१५ मिनिटांनी श्री मार्कंडेय मूर्ती प्रतिष्ठापना[9] करण्यात आली. १०.३० ते ११.१५ मि. पर्यंत तळघरात श्री भावनाऋषी व माता भद्रावती मूर्ती स्थापना केली. नंतर नागरिकांना दर्शन घेण्यास मुभा दिली. या दिवशी सात ते आठ हजार नारळ फोडण्यात आले. होमहवन पूर्णाहूती देऊन कार्यक्रमाचे सांगता झाली. पौर्णिमेला पालखी मिरवणूक झाली. महाद्वाराकरता श्रीमती नागमाई गुंटुक यांनी रुपये ४००० देणगी दिली. श्री पुंडलिक पल्ली यांनी चांदीचे सुंदर असे कमान करून दिली. १५ मार्च १९३१ रोजी झालेल्या सर्व साधारण सभेत 'श्री पद्मशाली देवस्थान संस्था' हे नाव बदलून 'श्री सोलापूर अखिल भारतीय पद्मशाली ज्ञाती संस्था'' असे करण्याचे निर्णय घेतले.

## मार्कंडेय मंदिराची रचना

श्री मार्कंडेय मंदिर हे पूर्वमुखी आहे. मध्यभागी मार्कंडेयाचे गर्भगृह[10] आहे. गर्भगृहात श्री मार्कंडेय यांचे कृष्णशीलेत सुबक मूर्ती भक्त या स्वरूपात आहे. दोन्ही हात जोडून समोर शिवलिंगावर नतमस्तक होऊन भक्ती करीत आहेत. मार्कंडेय याचे आसन भिंतीत देवकोष्ट बनवून त्यात आहे. समोर पितळी मखर आहे. देवकोष्ट्याच्या उजव्या बाजूस कोनाड्यात महर्षी मृकंड् मुनीची मूर्ती आहे. गर्भगृहाच्या लाकडी द्वारावर मयूर आणि गजराज यांच्या मुर्त्या कोरलेल्या आहेत. गर्भगृहाचे शिखर आतील बाजूने निमुळते होत जाते. अभिषेकाचे जल बाहेर येण्यासाठी शिवलिंगासमोर पीठावर लहान छेद असून ते जल गर्भगृहाच्या बाहेर गोमुखातून येते. गर्भगृहाच्या खाली तळघरात श्री भावनाऋषी व भद्रावती माता यांच्या काळ्या पाषाणातील मूर्ती आहेत. भावना ऋषी आणि भद्रावती हे उभे असून भावनाऋषी उजवा हात अभय मुद्रेत आहेत. दोन्ही मूर्ती देवकोष्टात आहे. समोर गाभारा आहे.

---

[9] हिंदू धर्मात विशेष समारंभ आहेत जेथे मंदिरांमध्ये पवित्र प्रतिमा औपचारिकपणे स्थापित केल्या जातात या प्रतिष्ठापन समारंभांना साधारणपणे दोन नावे दिली जातात: मूर्ति स्थापना आणि प्राण प्रतिष्ठा. मुर्ती या शब्दाचा अर्थ पवित्र प्रतिमा आणि "स्थापना" चा अर्थ "स्थापना" असा आहे आणि म्हणून मुर्ती स्थापना सोहळा "पवित्र प्रतिमेचे स्थान" आहे.

[10] गर्भगृह हे मंदिरातील प्रमुख देवतेचे मुख्य गर्भगृह आहे. जरी हा शब्द मुख्यतः हिंदू मंदिरांशी संबंधित असला तरी, तो जैन आणि बौद्ध मंदिरांशी देखील संबंधित आहे. खोलीला एकच प्रवेशद्वार आहे, कोणत्याही खिडक्याशिवाय. हे सहसा बाहेरील उपासकांना दिसावे म्हणून प्रशस्त पद्धतीने बांधले जाते.




तळघरात जाण्यासाठी वरच्या गर्भगृहातून उजवीकडून व डावीकडून पायऱ्या आहेत. डावीकडील बाजूने भावनाऋषी गर्भगृहातून परस्पर सभा मंडपात येण्यास वेगळे पायऱ्या आहेत. मार्कंडेय गर्भगृहासमोर दर्शन मंडप आहे. गर्भगृहाच्या द्वाराच्या उजव्या आणि डाव्या बाजूस संगमरवरी चतुर्भुज द्वारपाल[11] आहेत. दर्शन मंडपाच्या छतास जयपूर पद्धतीने काचेचे नक्षीदार काम आहे. दर्शन मंडपात नंदी असून त्यावर बारीक कोरीव काम आहे. नंदीचे डावीकडील दोन्ही पाय मुडपले असून उजवीकडील मागील पाय अर्धा मुडपून त्याचे खूर पोटा खालून डाव्या बाजूस आले आहे. उजवा पुढील पाय अर्धा मुडपून समोरील बाजूस आहे. दर्शन मंडपात येण्यासाठी सभागृहात समोरून पायऱ्या आहेत. गर्भगृहाच्या भोवती निरंधार रूंद प्रदक्षिणा मार्ग आहे. दर्शन मंडपाच्या समोर सभा मंडप असून वर पत्र्याचे शेड आहे आणि मध्यभागी प्लास्टिकचा मोठा डोम आहे. पत्राचे छत आणि डोम यामध्ये हवा खेळण्यासाठी मोकळी जागा ठेवली आहे. प्रदक्षिणामार्ग शेजारी उत्तर आणि दक्षिण बाजूस विश्रांतीसाठी वर छत असलेले प्रशस्त ओटा बांधले आहे. उत्तरेकडील बाजूस ओट्यावर वायव्य कोपऱ्यात पुजाऱ्यासाठी दोन खोल्या आहेत. दक्षिणेकडे ओट्यावर नैऋत्य बाजूस दैनंदिन कामकाजासाठी व कार्यकारी मंडळाच्या सभेसाठी ऑफिस आहे. मंदिरास दाक्षिणात्य मंदिराप्रमाणे चहू बाजूने तटबंदी असून पूर्वेस महाद्वार, पश्चिमेस द्वार तसेच दक्षिण व उत्तरेस मध्यभागी लहानसे द्वार आहेत. मंदिराच्या पूर्व बाजूस हमरस्ता असून मंदिराच्या बाहेरून अंतर्गत रस्ता आहे. नैऋत्य बाजू कडून मंदिराच्या पहिल्या मजल्यावर जाण्यासाठी जीना आहे. पहिल्या मजल्यावर दक्षिण आणि उत्तर बाजूस प्रशस्त हॉल बांधले आहेत हाॅल मोठे होण्यासाठी मंदिराच्या बाहेरील भिंतीच्या पुढे सहा सात फूटावर नवीन कॉलम उभे करून त्याच्या आधारावर हे बांधकाम केले. त्या कॉलमला सुंदर कमानी करण्यात आले. पश्चिम बाजूस तीन खोल्या आहेत. दक्षिणेकडील हॉलला खाली येण्यासाठी आग्नेय दिशेस अतिरिक्त जीना आहे. उत्तरेकडील हॉलला खाली उतरण्यास वायव्येला जीना आहे.

[11] द्वारपाल किंवा द्वारपालक (संस्कृत, "दरवाजा रक्षक" ) एक दरवाजा किंवा द्वारपाल आहे ज्याला सहसा योद्धा किंवा भयंकर राक्षस म्हणून चित्रित केले जाते, सहसा सशस्त्र द्वारपाल पुतळा संपूर्ण हिंदू बौद्ध आणि जैन संस्कृती सारख्या त्यांचा प्रभाव असलेल्या भागात एक व्यापक वास्तुशिल्प घटक आहे.



संपूर्ण मंदिर पाषाणात बांधलेले आहे. गर्भगृहातील सर्व अंतर्गत भिंती व दर्शन मंडपातील सर्व भिंतीवर संगमरवरी फरशी बसवले आहेत. त्यामुळे पूर्वीचा मूळ दगडी भिंतीवरील नक्षीकाम दिसून येत नाही पूर्वेकडील महाद्वाराशेजारी दोन्ही बाजूस एकेक खिडकी आहे. उजव्या बाजूला लहानसा दरवाजा आहे. महाद्वार दगडी असून दरवाजे लाकडी आहेत. त्याच्यावर कोरीव काम असून चहूबाजूने पितळी ठोकळ्यासारखे खिळे आहेत. महाद्वार, खिडक्या, देवकोष्ट, मंदिराचा छतापर्यंत अशा सर्व बाजूने भरपूर नक्षीकाम आहे. महाद्वाराच्या वर पहिल्या मजल्याच्या छताजवळ पूर्व बाजूने तीन देवकोष्ट[12] आहेत. त्यात कुठलेही मूर्ती नाहीत. दुसऱ्या मजल्यावर छतावर नैऋत्य बाजूस ध्वजासाठी स्तंभ आहे. मंदिराच्या हद्दीवर कंपाऊंड भिंत आहे

मंदिराचा शिखर महाराष्ट्रीयन पद्धतीने बांधलेला आहे. शिखर वर्तुळाकार असून वर निमुळता होत गेलेला आहे. वरच्या बाजूस गोलाकार कळशासारखा कुंभ आहे. त्यावर पितळी कळस आहे. शिखरावरील नक्षीकाम संपूर्ण खराब झालेले आहे. मंदिरात प्रदक्षिणामार्गाच्या नैऋत्य बाजूस मोकळ्या जागेत एका कट्ट्यावर शिवलिंग व नाग यांच्या मूर्ती आहे मंदिराच्या पश्चिम बाजूस हमरस्ता असून त्या पलीकडे सोलापूरचे वैभव असणारे ग्रामदैवत तलावातील श्री सिद्धेश्वरांचा भव्य मंदिर आहे.



## दरवर्षी विविध उत्सव

पद्मशाली ज्ञाती संस्थेतर्फे दरवर्षी विविध उत्सव साजरे केले जातात. नारळी पौर्णिमा हा महोत्सव दरवर्षी श्रावण शुद्ध प्रतिपदा ते पौर्णिमेपर्यंत संपन्न होत असते. मार्कंडेय मंदिरामध्ये दररोज सकाळी श्री ज्ञानेश्वरी पारायण व संध्याकाळी श्रीमद् भागवत यावरील प्रवचन हे कार्यक्रम आयोजित करतात. श्री गणेश, भावनाऋषी, रुद्राभिषेक करतात. पौर्णिमेला होम हवनादी धार्मिक विधी इत्यादी कार्यक्रम संपन्न

[12] देवकोष्ठ मंदिराच्या भिंतीवरील कोनाडा ज्यामध्ये देवतेची मूर्ती किंवा शिल्प ठेवलेले असते.

झाल्यावर प्रसाद वाटप करतात. या दिवशी समाजातील हजारो भक्त श्री मार्कंडेयाचे दर्शन घेतात. सकाळी ध्वजारोहण आणि विविध पूजा व महायज्ञ करतात. दुपारी मार्कंडेयाची गावात रथावर मिरवणूक निघते. यावेळी रथ मार्गावर समाजातील मंडळी सडा करून, रांगोळ्या काढून व कमानी उभारून श्रींचे भक्ती भावे स्वागत करतात. श्रींच्या मिरवणुकीत टिपरी, लेझीम, शक्ती प्रयोग, नृत्य, भजन अशा विविध कार्यक्रमांची रेलचेल असते. हातमाग आणि चरखा बैलगाडीवर ठेवून देखावा करतात. तसेच श्री मार्कंडेय, शंकर, यमराज यांचा सजीव देखावा ट्रक वर केला जातो. मिरवणुकीतील हातमागावर तयार केलेले वस्त्र सायंकाळी श्री मार्कंडेयास अर्पण केला जातो. या शोभायात्रेमध्ये विविध सामाजिक संस्था, युवक संघटना आणि इतर संस्था, संघ सक्रिय सहभाग घेतात. पद्मशाली पुरोहित संघाच्या वतीने सर्व धार्मिक कार्यक्रम संपन्न होतात. समाज बांधव या दिवशी मार्कंडेय मंदिरात यज्ञोपवित्र[13] धारण करतात.

## वर्षभर विविध इतर कार्यक्रम

समाजातील युवायुवतींच्या सुप्त कलागुणांचे संस्थेमार्फत रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धा, बुद्धिबळ स्पर्धा, टंकलेखन स्पर्धा तसेच लिंबू चमचा, संगीत खुर्ची, धावणे अशा स्पर्धांचे आयोजन केले गेले. सर्व स्पर्धांना उत्कृष्ट प्रतिसाद मिळतो आणि सर्वांना नंतर बक्षीसे वाटप केले जातात. सामुदायिक विवाहसंस्थेच्या वतीने दरवर्षी सामुदायिक विवाह केले जाते. त्यास समाजातील काही मान्यवर व पद्मशाली युवक संघटना संपूर्ण सहकार्य करतात. श्री मार्कंडेय जन्मोत्सव दरवर्षी माघ शुद्ध ३ रोजी मोठ्या प्रमाणात साजरा करतात. सदर दिवशी श्री मार्कंडेय महापूजा महारुद्राभिषेक करून मंदिरात प्रसाद वाटप होतो व मंदिराभोवती मार्कंडेयाची पालखी मिरवणूक काढण्यात येते. श्रीमान मार्कंडेय महर्षी यांचा नित्याभिषेक विविध भक्तांच्या वतीने होत असते. तसेच दरवर्षी माघ शुद्ध चतुर्थीला गणेश जयंती, माघ शुद्ध षष्ठीला भृगुमहर्षी वर्धापन दिन, चतुर्दशीस गणेश वर्धापन दिन, माघ वद्य चतुर्दशीस महाशिवरात्री, वैशाख शुद्ध पंचमीला श्री भावना ऋषी जयंती, कार्यक्रम संपन्न होतात नारळी पौर्णिमा महोत्सवासाठी समाजातील बांधव श्री मार्कंडेय मंदिरास रंगरंगोटी, गुलाल, महाप्रसादाचे प्लास्टिक पिशव्या तसेच श्रींच्या सर्व चांदीच्या साहित्याला पॉलिश, श्रींच्या मिरवणूक रथासाठी बैलजोड्या देणे असे कार्य मोफत करतात.

## पद्मशाली ज्ञाती संस्था, सोलापूर चा इ.स.१९७५ ते २००० पर्यंतचा वर्षातील विशेष कार्य इतिहास

**१९७५-७६ वर्षात अध्यक्ष श्री भुमय्या कोंडा व सरचिटणीस श्री नागेश कन्ना होते. या वर्षी आजीव सभासद ७२ होते. दैनंदिन कामासाठी समित्या नेमल्या.**

१) सामुदायिक विवाह समिती.

२) वधू वर सूचक समिती.

३) शिष्यवृत्ती समिती

४) डेड स्टॉक व जंगम माल समिती

५) स्मशानभूमी समिती

६) नारळी पौर्णिमा महोत्सव स्पर्धा समिती

७) मार्कंडेय देवस्थान समिती नारळी पौर्णिमा निमित्ताने विविध स्पर्धा आयोजित केले. चित्रकला स्पर्धा व रांगोळी स्पर्धेत ६०० स्पर्धक सहभागी झाले. वर्षभरात मद्दा मंगल कार्यालयात १७६ व मार्कंडेय मंदिरात २८ लग्न संपन्न झाले. ९० सामुदायिक विवाह झाले. द्रोण पत्रावळीचे व्यापारी श्री सी. पापया यांनी जिल्हा परिषद हद्दीतील सिटी सर्वे नंबर २१८/२० हा प्लॉट एकूण पंधराशे चौरस फूट जागा त्यांचे वडील कै. पापया लछमय्या चिट्टयाल यांचे स्मरणार्थ देणगी दिली.

सन १९७६-७७ वर्षांकरिता अध्यक्ष श्री बसपा मुद्दुंडी व सरचिटणीस श्री नागेश कन्ना यांची निवड झाली. संस्थेत दीडशे रुपयात सामुदायिक विवाह करून देत यावर्षी २९ सामुदायिक विवाह संपन्न झाले. श्री बुर्ला कुटुंब यांनी दिलेला मार्कंडेय रथ निकामी झाल्याने श्री नरसय्या राजण्णा श्रीराम यांनी कै. नरसिंग नरसय्या श्रीराम यांचे स्मरणार्थ नवीन रथ देणगी रूपाने दिले.

---

[13] यज्ञोपवित हा यज्ञ आणि उपवितम् या दोन तुकड्यांचा संयुक्त शब्द आहे. यज्ञ म्हणजे यज्ञ समारंभ आणि उपवितम म्हणजे पवित्र धागा. म्हणून, यज्ञोपवीत हा एक सोहळा आहे जिथे त्यागाची प्रतिज्ञा केली जाते आणि त्या प्रतिज्ञाची आठवण म्हणून एक पवित्र धागा घातला जातो.

सन १९७७-७८ वर्षाकरिता अध्यक्ष श्री बसप्पा मुदगुंडी व सरचिटणीस श्री नारायण पिट्टा यांची निवड झाली. संस्थेला निधी उत्पन्नासाठी आश्रयदाते, हितचिंतकव आजीव सभासद अशा माध्यमातून निधी उभारणे सुरू केले. यावर्षी रु. ४६००० निधी गोळा करून बँकेत मुदत ठेव केली. संस्थेच्या मद्दा मंगल कार्यालयात पूर्व विभाग वाचनालय सुरू आहे. यावर्षी मार्कंडेय अभिषेक फंड अशी नवीन समिती नेमली.

सन १९७८-७९ करीता अध्यक्ष श्री बसप्पा मुद्दुंडीव सरचिटणीस श्री नारायण पिट्टा यांची निवड झाली. यावर्षी १११ सामुदायिक लग्नकार्य झाले. मद्दा मंगल कार्यालयात १४० लग्न झाले. श्री गंगाधरपंत कुचन यांची शिवाजी विद्यापीठ सिनेटवर नियुक्ती झाल्यानिमित्त सत्कार केला. श्रीमती सत्यमाबाई मुत्तय्या बासन यांनी आपली संपत्ती घर क्र. १०२ डी ११४ भवानी पेठ सोलापूर येथील घर जागा २८८.८ चौरस मीटर हे पद्मशाली ज्ञाती संस्थेस देणगी म्हणून बक्षीस पत्र करून दिले.

१९७९ साली अध्यक्ष नारायण पिट्टा सरचिटणीस पुरुषोत्तम गज्जम होते. व्यापारात मंदी असल्याने विशेष देणग्या गोळा झाले नाहीत यावर्षी तज्ञ मंडळी, पद्मशाली पुरोहित संघ, श्री आशण्णा ईराबत्ती यांच्या विचारातून व शास्त्राद्वारे विचारविनिमय करून कुलदैवत श्री मार्कंडेय महर्षी यांचा जन्मदिवस माघ शुद्ध तीन ठरवून त्यानुसार जन्मोत्सव साजरा केले. सी पापया यांनी त्यांच्या दुकानाचे २१ वे वर्ष वर्धापन निमित्त पाच सामुदायिक विवाह स्वखर्चाने करून दिले. श्री राजय्या राजण्णा मच्छा यांनी एक सामुदायिक विवाह स्वखर्चाने करून दिले. श्री ईरप्पण्णा बोल्ली यांनी त्यांच्या साठाव्या वाढदिवसानिमित्त रुपये ५००१ ची देणगी दिली. स्मशानभूमीत केस काढण्यासाठी त्या ठिकाणी पत्र्याचे छत व मोक्षरथ ठेवण्यासाठी पत्रा शेड बनवले. श्री ईरप्पण्णा बोल्ली व श्री कोंडले बंधू यांचे कडून प्रत्येकी एक मोक्षरथ देणगी मिळाले. मार्कंडेय मंदिर सभागृहावरील पत्रे खराब झाल्याने बदलले. मंदिराच्या प्रदक्षिणा मार्गावर मागे नाग व लिंगउघड्यावर आहेत. तेथे लहानसा मंदिर बांधायचे ठरले.

सन १९८०-८१ करीता अध्यक्ष सिद्रामप्पा चिप्पा व सरचिटणीस व्यंकप्पा जक्कन यांची निवड झाली. यावर्षी ५९ सामुदायिक विवाह झाले. सी पापया व राजय्या मच्छा यांनी प्रत्येकी एक विवाह स्वखर्चाने करून दिले. श्री पंचाचार्य रंभापुरी मठाधिपती जगद्गुरुशंकराचार्य स्वामी यांनी मंदिरास भेट दिली. उर्वशी पारितोषिक विजेती तेलुगु सिने अभिनेत्री शारदा हिचा सोलापुरात समाजाच्या वतीने सत्कार केला. श्री नारायणराव पिट्टा व श्री लक्ष्मीनारायण बोल्ली हे कौलालंपूर (मलेशिया ) येथे भरलेल्या द्वितीय तेलुगु विश्व परिषदेस उपस्थित राहिले त्यामुळे त्यांचाही सत्कार केला.

सन १९८१-८२ करीता अध्यक्ष राजाराम कोडम व सरचिटणीस पुराणचंद्र पुंजाल यांची निवड झाली. संस्थेच्या कन्ना चौक येथील मंगल कार्यालय समोरील खुल्या जागेत (प्लॉट नंबर ८ व ९) रु. वीस लाख खर्चाचे तीन मजली इमारत बांधण्याचा प्रकल्प मंजूर करून प्रत्यक्ष कामास प्रारंभ केला. नियोजित इमारतीच्या तळ मजल्यावर २६ गाळ्यांची सोय असून पहिल्या मजल्यावर बँकेसाठी हॉल आणि दहा खोल्यांची सोय केली आहे. दुसऱ्या मजल्यावर मंगल कार्यालय साठी भव्य हॉल असून परगावाहून आलेल्या पाहुण्यांना राहण्यासाठी सहा खोल्या व एक स्वयंपाक खोलीची सोय करण्यात आले. पहिल्या टप्प्यात तळमजला व पहिला मजल्याचे बांधकाम करण्याचे ठरले. या प्रकल्पाचे भूमिपूजन संस्थेचे अध्यक्ष श्री राजाराम कोडम यांच्या हस्ते करण्यात आले. अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर खासदार आदरणीय श्री गंगाधरपंत कुचन यांच्या हस्ते पायाभरणी करून बांधकामास प्रारंभ करण्यात आले. या प्रकल्पाचे डिझाईन आर्किटेक्ट श्री कन्ना बुर्गुल असोसिएट यांनी तयार केलेला आहे. या वर्षी स्मशानभूमीत असलेल्या चारही अग्नीदाहक शेड समोर आलेल्यांना बसण्यासाठी पायऱ्या सहित दोन ओवऱ्या सोलापूर सहकारी सूतगिरणी सभासदांच्या सौजन्याने बांधण्यात आले. पायऱ्या समोरील जमिनीवर काळ्या दगडाचे फरसबंद श्री वेंकटेश्वर वेस्ट कॉटन स्पिनिंग मिल यांनी बांधून दिले. सोलापूर महानगरपालिकेने डांबरे रस्ता करून दिला. यावर्षी ६६ सामुदायिक विवाह झाले. यावर्षी श्री सी पापया, श्री अंबाजी गुर्रम व पद्मशाली युवक संघटना यांच्याकडून सर्व सामुदायिक विवाह खर्च करून दिले. नेहमीप्रमाणे श्री सत्यनारायण गालपल्ली यांनी मार्कंडेय मंदिराचे रंगरंगोटी विनामूल्य करून दिले

सन १९८२-८३ वर्षासाठी अध्यक्ष तुळजाराम दासरी व सरचिटणीस पुराणचंद्र पुंजाल यांची निवड झाली. आर्थिक अडचणीमुळे नवीन इमारतीच्या बांधकामात प्रगती झाले नाही. यावर्षी बांधकामाच्या मदतीसाठी राखी बक्षीस योजना काढली. परंतु याद्वारे अपेक्षित आर्थिक मदत गोळा झाली नाही. तळमजल्यावरील २६ गाळ्यांना प्रत्येकी रुपये अकरा हजार घेऊन देणगीदाराचे नावे फरशी बसवण्याचा निर्णय झाला. त्यास श्री राजाराम कोडम, श्री तुळजाराम दासरी, श्री दत्तोबा बेनगिरी, श्री शंकरराव येमूल यांनी प्रतिसाद दिला. यावर्षी ७९ सामुदायिक विवाह झाले. एकूण खर्च सी पापया आणि पद्मशाली युवक संघटना, श्री तुळजाराम दासरी यांनी केले. नारळी पौर्णिमा महोत्सवात प्रसाद वाटप खर्च ठाकूर सावदेकर आणि कंपनी लिमिटेड यांनी केले.

सन १९८३-८४ अध्यक्ष तुळजाराम दासरी व सरचिटणीस पुरणचंद्र पुंजाल यांची निवड झाली. स्मशानभूमीत सोलापूर महानगरपालिकेच्या सहकार्याने झाडे लावणे व तारेच्या कुंपणाभोवती बॉर्डर करून घेणे काम केले. यावर्षी ११ सामुदायिक विवाह झाले. कुंभकोणचे श्री यस आर जी रंगनाथन यांनी १७ मंगळसूत्रे देणगी दिले.

सन १९८४-८५ वर्षासाठी अध्यक्ष तुळजाराम दासरी व सरचिटणीस पुराणचंद्र पुंजाल यांची निवड झाली. नियोजित तीन मजले इमारतीचे पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले. लक्ष्मी बँकेने कर्जाच्या रूपाने सहयोग दिला. पहिल्या टप्प्याच्या वास्तूचे वास्तुशांती दिनांक २६ मे १९८५ रोजी अध्यक्ष श्री तुळजाराम दासरी व वास्तु प्रवेश सेक्रेटरी श्री पुराणचंद्र पुंजाल यांच्या हस्ते झाला. पद्मशाली भवनमचा उद्‌घाटन सोहळा दिनांक २९ जून १९८५ रोजी अखिल भारत काँग्रेस (एस) चे अध्यक्ष श्री शरद पवार साहेब यांच्या हस्ते खासदार श्री गंगाधर पंत कुचन यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारत पद्मशाली महासभाध्यक्ष श्री के वेंकटरमणप्पा यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. आतापर्यंत रुपये आठ लाख खर्च झाले. रुपये २५१ देणगी देणाऱ्या भाविकास वर्षातील एक दिवस मार्कंडेययाचे अभिषेक कायम देण्याचे ठरले.

सन १९८५-८६ साठी अध्यक्ष अंबाजी गुर्रम व सरचिटणीस जनार्दन कारमपुरी यांची निवड झाली. यावर्षी मार्कंडेय जन्मोत्सव माघ शुद्ध तृतीया रोजी मोठ्या प्रमाणात साजरा झाला. मार्कंडेय मंदिरात महाअभिषेक तीर्थप्रसाद वाटप आणि हजारोंच्या संख्येने भाविकांच्या उपस्थितीत श्रींची पालखी पंचकट्टा जवळून पाच प्रदक्षिणा करण्यात आले.

सन १९८६-८७ वर्षासाठी अध्यक्ष अंबाजी गुर्रम व सरचिटणीस जनार्दन कारमपुरी यांची निवड झाली. वर्षातील विविध महापूजेचे मानकरी यांच्याकडून देणगी प्राप्त झाली. यावर्षी ३२ सामुदायिक विवाह झाले. लक्ष्मीपती दासरी यांनी दोन लग्न, श्री सी पापया यांनी दोन लग्न, गणेश गुज्जा यांनी एक लग्न, सत्यनारायण सिंघमएक लग्न करून दिले. मार्कंडेय मंदिर परिसरातील अतिक्रमणे व अनाधिकृत व्यवसाय धारकांना पर्यायी जागा देऊन तेथून हलवण्याचा निर्णय महानगर पालिकेने ठराव पास करून घेतले. पद्मशाली भवनमचे दुसऱ्या टप्प्यातील बांधकाम पूर्ण होऊन तिसरा टप्पा बांधकाम सुरू झाले. पद्मशाली ज्ञाती संस्था व गणेश सेवा मंडळातर्फे गणेश चतुर्थीपासून अनंत चतुर्दशी पर्यंत श्री गणेश पंचायतन यागाचा सोहळा मद्दा मंगल कार्यालयात संपन्न झाला. हैदराबाद येथे दिनांक ८ व ९ मार्च १९८७ रोजी अखिल भारतीय पद्मशाली महासभेचे बारावे अधिवेशन साठी सोलापुरातून समाजाच्या वतीने सातशे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यात सोलापुरातील अनेक जणांची विविध पदावर नियुक्ती झाली. यावर्षी समाजातील डॉक्टरांच्या सहकार्याने मोफत आरोग्य शिबिर भरवले.

सन १९८७-८८ वर्षासाठी अध्यक्ष अंबाजी गुर्रम व सरचिटणीस राजीरु शेराल यांची निवड झाली. यावर्षी ४१ सामुदायिक विवाह झाले. सृमशानभूमीतील जुना हौद खराब झाल्याने पाडून कट्टा बांधण्यात आला व दोन मोठ्या सिमेंट टाक्या बसवले. श्री मार्कंडेय मंदिर परिसर मुक्तीसाठी मार्कंडेय जयंती दिनी महानगरपालिकेसमोर श्री दामोदर नल्ला सर व श्री सिद्राम जिंदमहे उपोषणास बसले. त्यास समाजातील अनेक लोकांनी चक्री उपोषण करून साथ दिली. पद्मशाली भवानामचे दुसऱ्या मजल्याचे बांधकाम कोणतेही कर्ज न घेता देणग्यातून व भाड्याच्या उत्पन्नातून पूर्ण केले.

१९८८-८९ वर्षासाठी अध्यक्ष भुमय्या येमुल व सरचिटणीस व्यंकप्पा जक्कन यांची निवड झाली. यावर्षी पद्मशाली भवनमचे दुसरा मधला बांधकाम समाज बांधवांच्या देणगीतून व संस्थेकडे येणाऱ्या भाड्यातून पूर्ण करण्यात आला. श्री वेंकटेश्वर मंदिर देवस्थान कमिटीने दररोज श्री मार्कंडेय नित्याभिषेक करण्यासाठी दूध देतात. तसेच पितळी श्री नक्षत्र आरती देणगी दिली.

सन १९८९-९० सालासाठी अध्यक्ष भुमय्या येमुल व सरचिटणीस माणिक सारंगी यांची निवड झाली. यावर्षी ४१ सामुदायिक विवाह झाले. मार्कंडेय महर्षी नित्य अभिषेक हा ग्रुप पूर्ण भरल्याने नवीन 'ब' यादी तयार करणे सुरू झाले. मद्दा मंगल कार्यालय येथील वरील मजल्यावरील माननीय विशेष लेखा परीक्षक सहकारी संस्था कार्यालय पद्मशाली भवनम येथे स्थलांतर करण्यात आले. श्री गणेश मंदिरावर भव्य व आकर्षक शिखर बांधण्यात आले. सोलापूर नागरी औद्योगिक सहकारी बँकेने बँकेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त मार्कंडेय मंदिरासाठी जनरेटर व खरेदीसाठी रुपये १५००० देणगी दिली. स्मशानभूमी येथे नागरिकांच्या पाण्याच्या सोयीसाठी श्री येलदी बंधूंनी रुपये ९००० देणगी दिली.

सन १९९०-९१ सालाकरीता अध्यक्ष भुमय्या येमुल व सरचिटणीस माणिक सारंगी यांची निवड झाली. पद्मशाली युवक संघटनेतर्फे आयोजित सामुदायिक विवाह कार्यक्रम साठी येणाऱ्या खर्चापोटी संस्थेने रुपये ३५०० देणगी देऊन सहकार्य केले. श्री श्री श्री सुंदर चैतन्यानंद स्वामीजी , मु. राजमंद्री (आंध्र प्रदेश) यांचे श्रीमद् भगवद्गीतेवरील बारावा अध्याय भक्ती योग या विषयावर संस्थेतर्फे १२ डिसेंबर १९९० ते २१ डिसेंबर १९९० पर्यंत कुचन प्रशालेच्या प्रांगणात प्रवचन आयोजित केले. श्री गणेश मंदिरावर त्यांच्या शुभहस्ते कळशारोहण केले. पद्मशाली ज्ञाती

संस्थेने पद्मशाली शिक्षण संस्थेत महिला तंत्र विज्ञान महाविद्यालय वास्तुसाठी संस्थेच्या मालकीचे गांधीनगर लगतची १३ एकर २० गुंठे क्षेत्र नाममात्र भाड्याने देण्याचे ठरावाप्रमाणे संस्थेस प्रधान करण्यात आले. या परिसरास पद्मशाली शिक्षण संस्थेचे श्री मार्कंडेय महाविद्यालय असे नाव देण्याचे ठरले. मार्कंडेय मंदिर परिसर अतिक्रमण प्रश्नी १९ नोव्हेंबर १९९० रोजी पद्मशाली युवक संघटनेच्या कार्यकर्त्यांनी आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबला. स्मशानभूमी येथे विविध सुविधा व बाग बगीचा होण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेने रुपये पन्नास हजार अनुदान मंजूर केले.

सन १९९१-९२ सालाकरीता अध्यक्ष दशरथ बुर्गुल व सरचिटणीस अनिल पल्ली यांची निवड झाली. संस्थेने १९६० मध्ये केलेल्या ठरावाप्रमाणे करार होऊन श्री मार्कंडेय मंदिर परिसरातील तिन्ही बाजूकडील १८ ते २० फूट परिसरातील अतिक्रमणे काढण्यात आली. मार्कंडेय मंदिर परिसरातील श्री सिद्धेश्वर देवस्थान मालकीचे सिटी सर्वे नंबर ६०५४ जमिनीपैकी ६५११ चौरस फूट जमीन पद्मशाली ज्ञाती संस्थेस व पद्मशाली ज्ञाती संस्थेचे मालकीचे सिद्धेश्वर पेठेतील सिटी सर्वे नंबर ६८५/४ प्लॉट नंबर १४, १५ व १६ जमिनीचे एकूण ९७६१ चौरस फूट जमीन श्री सिद्धेश्वर देवस्थान कमिटीस देण्याचा सन १९६० सालचा करार लेखी स्वरूपात माननीय शासनाचे प्रतिनिधी समोर दिनांक मार्च १९९१ रोजी झाला. सोलापूर महानगरपालिकेने या परिसरातील अतिक्रमण धारकांना पर्यायी जागा देऊन महत्त्वाची भूमिका बजावली. धर्मादाय आयुक्त पुणे यांनी दिनांक ९/३/१९९२ पत्रान्वये जागा अदलाबदलीस मान्यता दिली.

संस्थेचे दिनांक ३०/६/१९९१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सन १९९१ते ९४ या तीन वर्षासाठी अध्यक्षांची निवड व विश्वस्त मंडळ सभासदांची निवड झाली. श्री मार्कंडेय परिसर अतिक्रमण काढल्याशिवाय अध्यक्ष व कार्यकारी मंडळात बदल करू नये असे ठरले होते. अतिक्रमण प्रश्नावर करार झाल्यानंतर दिनांक ६/१०/१९९१ रोजी संस्थेची विशेष सभा सर्वसाधारण सभा भरली व १९९१ ते १९९४ या तीन वर्षासाठी अध्यक्ष म्हणून श्री दशरथ विठोबा बुर्गुल व १४ विश्वस्त मंडळ सभासदांची निवड करण्यात आली. पद्मशाली भवनम साठी केलेल्या कर्जाच्या परत फेडीसाठी पद्मशाली शिक्षण संस्थेने रुपये ६,६५,००० बिनव्याजी कर्ज मंजूर केले. त्यामुळे संस्थेने नागरी बँकेचे सर्व करताना व्याजासह भरले. पद्मशाली भवनम भाडेकरू कडून येणाऱ्या भाड्यातून रुपये तीस हजार इतके रक्कम पद्मशाली शिक्षण संस्थेकडे परतफेड करायचे ठरले. पद्मशाली स्मशानभूमीत सोलापूर महानगरपालिकेने दोन स्नानगृह व एक संडास बांधून दिले. पाण्याच्या टाकीसाठी श्री मल्लय्या ईट्टम यांनी रुपये १५००० देणगी दिली

सन १९९२-९३ (अध्यक्ष दशरथ बुर्गुल व सरचिटणीस अनिल पल्ली) या अहवाल सालात पद्मशाली भवनम मधील टेलिफोन कार्यालय अन्यत्र गेल्यानंतर एलआयसी कार्यालयाला भाड्याने देण्यात आले. संस्थेने अक्कलकोट रोडवरील सर्वे नंबर १३ येथे नवीन मंगल कार्यालय बांधण्याचे ठरवले. त्यासाठी श्री अरविंद बोमड्याल यांनी रुपये सहा लाख एक्कावन हजार देणगी देण्याचे मान्य करून रुपये एक लाख अहवाल सालात दिले. १९९३-९४ अहवाल उपलब्ध झाले नाही.

सन १९९४-९५ वर्षासाठी अध्यक्ष नारायणराव कमटम सरचिटणीस व्यंकप्पा जक्कन यांची निवड झाली.अक्कलकोट रोड लगतच्या संस्थेच्या मालकीचे सिटी सर्वे नंबर १३ या जागेवर ६४ गाळ्यांच्या बांधकामाचा शुभारंभ करून २४ दुकानाचा बांधकाम सुरू केला. त्यासाठी रुपये बारा लाखापर्यंत बांधकाम खर्च झाला. स्मशानभूमीतील कामासाठी आमदार श्री लिंगराज वल्याळ यांनी रुपये तीन लाख व माजी आमदार श्री प्रकाश यलगुलवार यांनी रुपये दोन लाख सत्तर हजार इतकी आर्थिक मदत सरकारकडून दिले. मार्कंडेय मंदिर भोवती कंपाऊंड बांधणेसाठी महानगरपालिकेकडून तीन लाख अनुदान मंजूर झाले.

सन १९९५-९६ सालाकरीता अध्यक्ष नारायणराव कमटम सरचिटणीस शंकरराव वडिशेरला यांची निवड झाली. नारळी पौर्णिमा उत्सवासाठी महानगरपालिकेकडून रुपये पंचवीस हजार अनुदान मिळाले. श्री मार्कंडेय मंदिर भोवती कंपाउंड बांधून फरशीकरण पूर्ण झाले. अक्कलकोट रोड लगत शॉपिंग कॉम्प्लेक्स इमारती वरील मंगल कार्यालय बांधकाम आर्थिक अडचणीमुळे बंद पडला होता. त्यानंतर विश्वस्त मंडळाच्या सभेमध्ये पुन्हा विचार करून आतापर्यंत तळघर व बावीस गाळे देणग्या व डिपॉझिट रकमेतून बांधून पूर्ण केले. या शॉपिंग सेंटर साठी श्रीमती लक्ष्मीबाई चलमल, श्री कृष्णाहरी दुस्सा, श्री रायमल्लु कमटम बंधू व श्री नारायणराव गाली यांनी प्रत्येकी रुपये २५००० देणगी दिली. मार्कंडेय मंदिर जिर्णोद्धार निधी म्हणून आपल्या समाजातील प्रत्येक कारखान्यात निधी पेट्या ठेवण्यात आल्या. अंदाजे तीनशे पेट्या कारखान्यात ठेवण्यात आले. संस्थेची जागा अर्बन लँड सिलिंग मध्ये जाऊ नये म्हणून प्रमाणपत्र मिळवण्याचे काम सुरू आहे. सिटी सर्वे मध्ये प्रॉपर्टीवर अनेक वर्षापासून जुन्या विश्वस्तांचे नावे लागलेले होते. त्यामुळे नवीन पाच विश्वस्तांच्या नावे सन १९९४ ते २००० या वर्षासाठी लावण्यात आले. सन १९८२-८३ पासून संस्थेच्या उत्पन्नावर अंशदान रुपये १,१२,७२० भरले आहे

सन १९९६-९७ सालासाठी अध्यक्ष श्री नारायणराव कमटम व सरचिटणीस श्री बालकिसन आरगे यांची निवड झाली. नारळी पौर्णिमा कार्यक्रमासाठी महानगरपालिकेकडून रुपये पंचवीस हजार अनुदान मिळाले. शांतीधाम येथे मलय्या ईट्टम व कृष्णाहरी दुस्सा यांनी लोखंडी मोक्षरथ साठी देणगी दिली. मार्कंडेय मंदिर येथे कंपाउंड फरशीकरण व दोन गेट हे काम सर्व पूर्ण झाले. श्री भृगु महर्षी मंदिर गळत असल्याने दुरुस्ती करून रंग रंगोटी करण्यात आली. अक्कलकोट रोड लगत शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधकाम सुरू आहे. पद्मशाली भवन येथे रंगरंगोटी करण्यात आले. सर्व भाडेकरूना भाडेवाढ करणे ठरले. अर्बन लँड सीलिंगना हरकत प्रमाणपत्र मिळवण्याचे काम सुरू आहे. संस्थेच्या जागेवरील बिनशेती सारा रुपये ६४५३९ आकारण्यात आले ते माफ करणे काम सुरू आहे.

सन १९९७-९८ सालाकरीता अध्यक्ष उमेश कन्ना व सरचिटणीस नागनाथ गंजी यांची निवड झाली. शांतीधाम येथील दुरुस्ती कार्यासाठी महानगरपालिकेकडून रुपया चार लाख अनुदान मिळाले. नगरसेवक श्री पांडुरंग दिंडी यांनी दहा सोडियम व्हेपर दिवे व नगरसेवक श्री सुरेश तमशेट्टी यांनी सोलापूर महानगरपालिका कडून अनुदान मंजूर करून दिले. मार्कंडेय मंदिर सुधारणा कामासाठी महानगरपालिकेकडून रुपये दोन लाख अनुदान मंजूर झाले.

सन १९९८-९९ वर्षांकरिता अध्यक्ष उमेश कन्ना व सरचिटणीस नागनाथ गंजी यांची निवड झाली. मार्कंडेय मंदिर सुधारणा कामासाठी महानगरपालिकेकडून रुपये तीन लाख मंजुरी दिली.

सन १९९९-२००० वर्षांकरिता अध्यक्ष उमेश कन्ना व सरचिटणीस मनोहर ईगे यांची निवड झाली. मार्कंडेय शॉपिंग सेंटर बी ग्रुप वास्तूचे दिनांक २४/५/२००० रोजी वास्तुशांती व सत्यनारायण पूजा संस्थेचे सहचिटणीस श्री दयानंद कोंडाबत्तीनी यांचे हस्ते करण्यात आले. वास्तूचे उद्‌घाटन सोलापूर मेडिकल कॉलेजचे अधीक्षक मा. डॉ. विश्वनाथ येमूल यांच्या हस्ते करण्यात आले. संस्थेची सध्याची पालखी नादुरुस्त झाल्याने नवीन करण्याचे ठरले. शांतीधाम येथे लहान मुलांचे शव गायब होत आहेत व मुंडके हे इतर ठिकाणी आढळत आहेत. त्यामुळे सेवकांना पोलिसांकडून त्रास होत आहे. स्मशानभूमीतील विहिरीमध्ये दोन तीन आत्महत्या प्रकार घडले. शांतीधाम मधील पाण्याच्या सोयीचा आजूबाजूतील झोपडपट्टीतील व बाहेरील लोक येऊन अपव्यय करीत आहेत. त्यामुळे त्याचा बंदोबस्त करणे विषयी विचार विनिमय केले. महानगरपालिकेकडून अंतर्गत रस्ते, लाइटिंग, स्ट्रीट लाईट व इतर कामासाठी महानगरपालिकेकडून नगरसेवकांच्या निधीतून अनुदान मंजूर झाले. मद्दा मंगल कार्यालय येथील किरकोळ दुरुस्ती व विद्युत कामे आणि रंगरंगोटी केले.

### तळटीपा:

१. प्रा.वि.गो. यंगलवार. पद्मशाली समाजाचा इतिहास. प्रकाशक श्री रेणुका प्रकाशन. २०२०.पान क्र. ६१ व ६३

२. विकिपीडिया . पद्मशाली जात इतिहास. तारीख १२/५/२०२३

३. सोलापूर डिस्ट्रिक्ट गॅझेटीयर १९७७.पृ.१ .

४. **OPCIT** प्रा. विजय गोविंदराव यंगलवार. प पान.४७.

५. श्री विष्णू पुराण. गीता प्रेस गोरखपूर. २०१४ पान.४७.

६. विकिपीडिया. भारतकोष. उपनयन संस्कार. विषय २.

७. मराठी विश्वकोश. महाराष्ट्र राज्य मराठी निर्मिती मंडळ. धर्मविभाग. सप्तचिरंजीव पाठ.

८. आशण्णा लक्षमय्या इराबत्ती. माझ्या आयुष्यातील टिपणे. प्रकाशक सोलापूर समाचार प्रेस. १९७०. पान ११.

९. रामशास्त्री म्याना. प्रकाशक श्री पद्मशाली युवक पुरोहित संघम. सोलापूर. २०१२. पान १०३

१०. पं. भगवानदास जैन. प्रासाद मंडन. प्रकाशक बी एस शर्मा. १९६३ पान ७३ व पा.२१८.

११. **OPCIT** पं. भगवानदास जैन पा.२१८

१२. पुरातत्व : एक पर्यालोचन. डॉ.माया पाटील. प्रकाशक सुविधा प्रकाशन. २०१८ पान ६३

१३. वेब दुनिया: हिंदू धर्म के पवित्र सोला संस्कार, टीप क्र. १०.

### संदर्भ

- माझ्या आयुष्यातील टिपणे : लेखक आशण्णा लक्षमय्या इराबत्ती
- मार्कंडेय पुराण , पद्मपुराण. : प्रकाशक: गीता प्रेस गोरखपूर
- मंदिर शिल्पे : लेखिका डॉ. माया पाटील
- कांचीची वैभवशाली मंदिरे : लेखक गुरु केनकार्य चक्रवर्ती, अनुवाद श्रीवर्धन कोनापुरे *भारताची मूर्तिकला : पं. महादेवशास्त्री जोशी
- पद्मशाली यशोगाथा.पद्मशाली समाजाचा इतिहास, श्री क्षेत्र मार्कंडा देव , वस्त्रोद्योगाचे प्रणेते भावना ऋषी - लेखक प्रा. विजय यंगलवार
- महर्षी मार्कंडेय जी की भविष्यवाणी, पुणेकर पद्मशाली. लेखक मुकुंदराज शिंगारम पद्मशाली ज्ञाती संस्थेचे १९७५-७६ ते १९९९-२००० पर्यंतची वार्षिक अहवाल.


**प्रत्यक्ष मुलाखती**

१. अंबाजी गुर्रम ( माजी अध्यक्ष)

२. पुरणचंद्र पुंजाल ( माजी अध्यक्ष )

३. जनार्दन कारमपुरी ( माजी अध्यक्ष )

४. मनोहर ईगे ( माजी सरचिटणीस)

५. सुरेश फलमारी ( अध्यक्ष)



**श्री. नागदेव रामशास्त्री म्याना**
**बी एस्सी (केमिस्ट्री), एम . ए. (ए. आय.एच.सी. & ए.)**
**संशोधन अभ्यासक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ.**